नमुना !! विक्रीपत्र !!

नमुना विक्रीपत्र प्लॉटचे, मौजे धावेडी ता.जि. जालना येथील गट नंबर 171,172 व 173 मधील मॅनोर बंगलो प्लॉटस प्रकल्प मधील प्लॉट नंबर ..... ज्याचे एकूण क्षेत्रफळ ..... चौरस मीटरचे, किंमत रक्कम ...../- ..... रुपये फक्त.

(झोन नंबर 2, दर प्रति चौरस मीटर ...../- रुपये)

.....

अकृषिक परवाना क्र. जा.क्र.2012/अकृषिक/सिआर-24,27,28 उप विभागीय अधिकारी कार्यालय जालना, दिंनाक 27/09/2012

.....

विक्रीपत्र लिहून घेणार :-

!! यांच्या हक्कात हे !!

विक्रीपत्र लिहून देणार :- **श्री. अंनत मुंकुद कुलकर्णी,**
वय 68 वर्षे, धंदा शेती व व्यापार,
रा. एच.आय, आर एच. 4 सेक्टर 6, वाशी.
नवी मुंबई

पॅन नंबर :- **ADBPK 6888 N** (ADBPK 6888 N)

कारणे विक्रीपत्र लिहून देतो ऐसा जे की, जिल्हा व जिल्हा परिषद जालना तालुका व पंचायत समिती जालना रजि.तुकडी व पोट तुकडी जालना, ग्रामपंचायत पैकी मौजे धावेडी ता. जि. जालना येथील **गट नंबर 171,172 व 173** मधील माझ्या मालकी व कब्जाचा एक सहान प्लॉट ज्याचा प्लॉट नंबर ..... असा असून ज्याची **लांबी दक्षिण- उत्तर ..... फुट** व **रुंदी पुर्वे-पश्चिम ..... फुट = ... चौरस फुट म्हणजेच ..... चौरस मीटर** सहान प्लॉट मी तुम्हांस माझ्या संपुर्ण मालकीहक्कासह कायमचा विक्री केला आहे. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस :-
पश्चिमेस :-
दक्षिणेस :-
उत्तरेस :-

यावरिल चतुःसिमेच्या आतील वर वर्णन केलेला सहान प्लॉट मी तुम्हांस एकूण किंमत रक्कम ...../- ..... **रुपये** मध्ये कायमचा विक्री केला असून विक्रीची संपुर्ण किंमत रक्कम रुपये ...../- ..... **हजार रुपये** मला तुमचेकडून सदर विक्रीपत्र नोंदणीपुर्वीच नगदी/धनादेशाव्दारे प्राप्त झालेली आहे. आता रक्कम वसुलीबददल माझा काहीही वाद किंवा तक्रार राहीलेली नाही. सदर प्लॉटवर तुमचा प्रत्यक्षरित्या ताबाही मी यापुर्वीच करुन दिला आहे. आता ताब्यासंबंधी वाद किंवा तक्रार राहीलेली नाही तुमच्या ताब्यात माझ्या वारसांनी अथवा इतर कोणीही कसल्याही प्रकारचा अडथळा निर्माण केल्यास तो दूर करण्याची संपुर्ण जवाबदारी माझ्यावर आहे व राहील.

हे की, सदर विक्री मिळकती संबधाने प्लॉट नंबर 83 ते 112 चे संबधी बॅक ऑफ बडोदा शाखा मुंबई चे नाहारकत प्रमाणपत्र दिंनाक 18/02/2019 सोबत जोडले असून विक्री मिळकतीचा मी निर्वीवाद मालक व कब्जेदार आहे.

सदर विक्री प्लॉट संबधाने माझे मालकीहक्क निर्दोष व परिपूर्ण आहेत. तुमचे मालकीहक्क परिपूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल असा दस्ताऐवज मी तुमच्या हक्कात विना मोबदला विना तक्रार लिहून नोंदवुन देईन सदर विक्री प्लॉट संबधाने कोणत्याही मा. न्यायालयात वाद वगैरे प्रलंबित नसून सदरील प्लॉट कोणत्याही प्रकारे वादाचा विषय नाही तसे काहीही आढळून आल्यास ते निवारण करण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे व राहील.

हे की, विक्री मिळकतीचा प्रत्यक्ष निर्वेध कब्जा मी तुम्हांला मिळकतीत प्रत्यक्ष हिंडून फिरुन व मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी करुण हद्दीच्या खुणाबद्दल वाद नाही. विक्री मिळकत पैकी कौणत्याही क्षेत्रात अतिक्रमण नाही.

हे की, सदर विक्री प्लॉटवर आता माझा किंवा माझे इस्टेट वारसांचा कोणल्याही प्रकारचा हक्क व संबध राहीलेला नाही. सदर विक्री प्लॉटचा तुम्ही तुमच्या इच्छेनुसार वंशपरांगत निंरतर उपभोग घ्यावा अथवा विल्हेवाट लावावी. त्यास माझा काही उजर किंवा आक्षेप राहणार नाही.

सदरहू विक्री प्लॉट सातबारावरुन सदरील प्लॉटचे खरेदीखत करुन देत आहे. जर सदर दस्तामधील माहिती चुक व खोटी आढळून आल्यास नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 82 नुसार आम्ही लिहून देणार व लिहून घेणार शिक्षेस पात्र राहतील

या विक्रीपत्राचे दस्ताऐवजासोबत 7/12 उतारा, एन.ए.ऑर्डर, ले-ऑऊट, एन.ए. टॅक्स पावती, स्थळ दर्शक नकाशा, मुंद्राक शुल्क व नोंदणी फी चलन प्रत, देणार-घेणार व दोन साक्षीदार यांचे ओळखपत्र सोबत जोडले असून हे सर्व कागदपत्रे या दस्ताचे अविभाज्य भाग समजण्यात येतील. सदर विक्री प्लॉटचे आता या विक्रीपत्राआधारे तुम्ही सदर प्लॉटचे विद्यमान मालक व कब्जेदार झाले असून मालक व कब्जेदार या नात्याने सरकारी राजस्व कागदोपत्री तुम्ही तुमच्या नांवाने अंमल करुन घ्यावा त्यास माझा काही उजर राहणार नाही.

करिता हे विक्रीपत्र मी माझ्या राजीखुशीने व स्वसंतोषाने तुमच्या हक्कात कायमस्वरुपी लिहून दिले आहे. जे माझ्यावर माझ्या इस्टेट वारसांवर सारखेचरित्या बंधनकारक आहे व राहील. जे सही असे दिंनाक ...../...../2019 जालना

विक्रीपत्र लिहून देणार, मसुदा सांगणार

श्री. अंनत मुंकुद कुलकर्णी

.....

विक्रीपत्र लिहून घेणार, मसुदा सांगणार

.....

साक्षीदार

1)

2)